**CNR NO.MHDH040005372019**
**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.७/२०१९**
दिपाली गणेश सोनवणे (पारधी) वगैरे
–वि–
गणेश बापु सोनवणे (पारधी) वगैरे

## निशाणी ४ वरील आदेश

अर्जदारांनी मूळ अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायद्यानुसार दाखल केला असून प्रस्तुतचा अर्ज सदर कायद्याचे कलम २३ प्रमाणे दाखल केलेला आहे. जाबदेणार यांना नोटीसीची बजावणी होवुन ते वकीलामार्फत हजर झाले. जाबदेणार याने नि. १९ अन्वये आपले म्हणणे दाखल केलेले आहे.

२. अर्जाचे व त्यावरील दाखल म्हणण्याचे अवलोकन केले. अर्जदार व जाबदेणार यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत अर्जाच्या निर्णयाकामी माझ्यासमोर पुढील प्रश्न उपस्थित होत असून खालील कारणमिमांसेआधारे मी त्यांचे निष्कर्ष त्यांच्या पुढे नोंदविले आहेत.

| | प्रश्न | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | प्रथमदर्शनी अर्जामध्ये जाबदेणार याने अर्जदाराविरुध्द कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य केले हे दिसुन येते का ? | | होय. |
| २. | अर्जदार ही अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहेत काय ? | – | होय. अंतिम आदेशाप्रमाणे. |
| ३. | अर्जदार ही अंतरिम घरभाडे मिळण्यास पात्र आहेत काय ? | – | होय. अंतिम आदेशाप्रमाणे. |
| ४. | अर्जदार हि जाबदेणा यांनी त्यांचे घर व शेत मिळकती कोणासही हस्तारीत करु नये, बोझा चढवु नये असा आदेश मिळण्यास पात्र आहे काय? | | नाही. |
| ५. | आदेश काय ? | – | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**प्रश्न क्र.१ करीता –**

३. माननीय सर्वेच्च न्यायालय यांनी पारीत केलेल्या Rajnesh Vs. Neha and

Anr, CRIMINAL APPEAL NO. 730 OF 2020 (Arising out of SLP (Crl.) No. 9503 of 2018) सुपुर्द दिनांक ०४.११.२०२० च्या आदेशान्वये प्रत्येक पोटगीच्या अर्जाचे कामी प्रकरणातील दोन्ही पक्षांनी शपथेवर आपले उत्पन्न, जमा व खर्चाच्या विवरणाबाबत शपथपत्र दाखल बंधनकारक केलेले आहे. प्रस्तुत अर्जात अर्जदार हिने नि. १८ वर आपल्या उत्पन्न  जमा व खर्चाचे विवरणाबाबत शपथपत्र दाखल केलेले आहे. याउलट, जाबदेणार यांना वारंवार संधी देवुन देखील त्यांनी त्यांच्या उत्पन्न, जमा व खर्चाचे विवरणपत्राचे शपथपत्र दाखल केलेले नाही.

४. अर्जदाराचा अंतरिम खावटी मिळण्यासाठीचा अर्ज आणि त्यावरील जाबदेणार यांनी  दिलेल्या खुलास्यावरुन असे दिसून येते की, अर्जदार व जाबदेणार क्र.१ हे पती पत्नी, अर्जदार क्र. २ व ३ हि त्यांची मुले असुन आज रोजी त्यांचे नातेसंबंध कायम आहेत. तसेच इतर जाबदेणार हे जाबदेणार क्र. १ याचे नातेवाईक आहेत. तसेच दोन्ही बाजुचे युक्तीवाद व परिस्थितीवरुन हे निश्चित होते की, अर्जदार आणि जाबदेणार यांनी परस्परविरोधी कथने केलेली आहेत. आज रोजी अर्जदार हे जाबदेणार यांचे पासुन वेगळी राहत आहे व जाबदेणार यांनी अर्जदारांवर कौटुंबिक हिंसाचार केल्याचे सांगितले आहे. म्हणुन प्रथमदर्शनी अर्जदार ही महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासुन संरक्षण कायद्यानुसार पिडीत व्यक्ती असल्याचे दिसुन येते.

५. अंतरिम पोटगीच्या अर्जाच्या वेळी अर्जदाराने केलेले कथन सिध्द करणे अपेक्षीत नाही. तसेच, जाबदेणार यांनी सुध्दा त्यांचे विरुध्द किंवा त्यांनी केलेले कथन सिध्द करणे आवश्यक नाही. यावेळी केवळ अर्जदाराने केलेल्या अर्जामध्ये महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासुन संरक्षण कायद्याचे तरतुदींप्रमाणे प्रथमदर्शनी कौटुंबिक हिंसाचार दिसुन येतो काय हे महत्वाचे आहे. अर्जामध्ये नमुद जाबदेणार यांनी अर्जदारास कोणतेही संयुक्तीक कारण नसतांना वेळोवेळी पैशांची मागणी करुन अर्जदाराचा केलेला शारिरिक व मानसिक छळ, चारीत्र्यावर संशय घेवुन मारहाण करणे, उपाशी ठेवणे, अश्लील भाषेत शिवीगाळ करुन अर्जदारास मारहाण करणे, दारुच्या नशेत मारहण करणे, टोचुन बोलुन अपमानीत करुन भांडण करणे, अर्जदाराचे पालन पोषण न करणे, शिवीगाळ करणे व घरातुन हाकलुन देण्याच्या घटनांवरुन असे दिसुन येते की, हे सर्व कौटुंबिक हिंसाचाराचेच कृत्य आहे. म्हणुन, प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, जाबदेणार यांनी अर्जदारांविरुध्द कौटुंबिक हिंसाचाराचे कृत्य केलेले आहे. त्यामुळे, मी प्रश्न क्र.१ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**<u>प्रश्न क्र.२ व ३ करीता</u> –**

६. आज रोजी अर्जदार हे जाबदेणार यांचेसोबत राहत नाहीत. अर्जदार हीला

खरोखरच मानसिक व शारिरिक त्रास होता व जाबदेणार यांनी तिचेवर कौटुंबिक हिंसाचार केला किंवा कसे हे सबळ पुराव्यानिशी मुख्य अर्ज निकाली काढण्याच्या वेळेस विचारात घेता येईल. परंतु, अंतरिम स्थितीमध्ये असे दिसुन येते की, अर्जदार हे जाबदेणार क्र.१ याचेपासुन वेगळे राहत असल्यापासुन जाबदेणार क्र. १ याने तो अर्जदार क्र. १ हिचा पती व अर्जदार क्र. २ व ३ यांचा पिता या नात्याने त्यांच्या पालन पोषणाची व उदरनिर्वाहाची त्याची नैतीक जबाबदारी असतांना ती पार पाडलेली नाही. जाबदेणार क्र.१ हा अर्जदार क्र. १ हिचा पती व अर्जदार क्र. २ व ३ यांचा पिता या नात्याने त्यांचे पालनपोषण करण्याची कायदेशीर व नैतिक जबाबदारी आहे. परंतु त्याने त्याची जबाबदारी पार पाडलेली नसल्यामुळे अर्जदार हे पोटगी व घरभाडे मिळण्यास पात्र आहे.

७. दोन्ही बाजुंच्या युक्तीवादावरुन व अभिलेखावर दाखल कागदपत्रांवर असे दिसुन येते की, अर्जदाराने नि. १८ वरील शपथपत्रात जाबदेणार क्र. १ हा महाराष्ट्र पोलीस खात्यात नोकरीस असुन दरमाह ७०,०००/– पगार कमवितो. तसेच जाबदेणार याच्या मांडळ ता. अंमळनेर येथे कडीपाटचे पक्की इमारत ६ रुमची व वसई शहरात एव्हरशाई इमारतीत प्लॉट अशा अचल मिळकती असुन आजरोजी जाबदेणार याच्यावर अर्जदारांव्यतिरीक्त इतर कोणीही अवलंबुन नाही असे कथन केले आहे. याउलट, अर्जदार क्र.१ हिस उत्पन्नाचे कोणतेही साधन नसुन ती व अर्जदार क्र. २ व ३ असे पुर्णपणे जाबदेणार याच्यावर अवलंबुन असल्याचे कथन केले आहे. तसेच, अर्जदार हे दोंडाईचा येथे भाडयाच्या घरात राहत असल्याचे कथन केले आहे. परंतु, तिने तिच्या कथनाच्या पृष्ठार्थ जाबदेणार याचे उत्पन्न व मिळकतीबाबत कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे केवळ अर्जदाराने तिच्या शपथपत्रामध्ये नमुद केले म्हणुन जाबदेणार यांचे उत्पन्न तिने सांगितले आहे तेवढे समजता येणार नाही. तसेच, जाबदेणार यास वारंवार संधी देवुन देखील त्याने त्याचे उत्पन्न, जमा व खर्चाचे विवरणाचे शपथपत्र दिलेले नाही.

८. एकंदरित अभिलेखावर आलेल्या बाबींवरून अर्जदाराने तीने दिलेल्या नि.१८ वरील शपथपत्राप्रमाणे जाबदेणार क्र. १ हा पोलीस खात्यात नोकरीस आहे असे कथन केलेले आहे. याउलट, जाबदेणार क्र. १ याने दिलेल्या खुलाश्यात तो पोलीस खात्यात नोकरीस असल्याची बाब मान्य केली आहे. परंतु, त्यास दरमहा किती पगार आहे याबाबत कोठेही कथन केलेले नाही. याठिकाणी ही बाब लक्षात घेणे आवश्यक आहे की, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार प्रस्तुत प्रकरणात दोन्ही पक्षकारांनी त्यांच्या उत्पन्नाबाबत शपथपत्र दाखल करणे अपेक्षीत असुन त्यामध्ये त्यांचे निश्चीत उत्पन्न नमुद करणे अपेक्षीत आहे. परंतु जाबदेणार क्र. १ याने त्यास त्याचे सदर शपथपत्र दाखल करणेकरीता वारंवार संधी देवुन देखील त्याने त्याचे शपथपत्र दाखल करुन त्याचे निश्चीत उत्पन्न न्यायालयासमोर नमुद करण्याचे टाळलेले असल्याचे दिसुन येते. त्यामुळे, जाबदेणार क्र. १ यांस निश्चीत

किती उत्पन्न आहे हे त्याच्या म्हणण्यातुन बोध होत नाही. अशा वेळी दोन्ही पक्षकारांच्या एकंदरीत जिवनमान व राहणीमानानुसार आणि जाबदेणार क्र. १ हा पोलीस खात्यात नोकरीवर असल्याने त्याचे उत्पन्न गृहीत धरावे लागेल. अर्जदार हिने दाखल केलेल्या मालमत्ता पत्रकावरुन असे दिसुन येते की, जाबदेणार क्र. १ हा पोलीस खात्यात नोकरीस असुन त्याच्या नावे स्थावर मिळकती आहेत. यावरुन, जाबदेणार यांस निश्चीत व नियमीत उत्पन्नाचे साधन असल्याचे याठिकाणी गृहीत धरता येईल.

९. माझे समोरील दाखल कागदपत्रांवरुन अर्जदारांनी त्यांना प्रत्येकी दरमहा रक्कम रुपये १०,०००/– अंतरिम पोटगी व रक्कम रुपये २,०००/– घरभाडयाची केलेली मागणी अवास्तव वाटते. अंतरिम पोटगी मंजुर करतांना न्यायालयाने अर्जदाराच्या जीवनावश्यक गरजा तसेच, दोन्ही पक्षकारांतील समाजातील स्थान याचा विचार करुन अर्जदाराला किती पोटगी देणे न्यायोचित राहील हे ठरवणे महत्वाचे आहे. त्यामुळे सदर दोन्ही अर्जदाराच्या जीवनावश्यक गरजा, जाबदेणार क्र.१ चे उत्पन्नाचे साधन व त्याचेवरील जबाबदा–या यांचा विचार करता अर्जदारांना पोटगी व घरभाडे म्हणुन एकत्रीत रक्कम रुपये ८,०००/– देणे योग्य होईल. त्यानुसार मी प्रश्न क्र २ व ३ चे उत्तर त्याप्रमाणे दिलेले आहे.

**<u>प्रश्न क्र. ४ करीता</u>** –

१० अर्जदारांनी त्याच्या अंतरीम खावटीच्या अर्जात कथन केल्याप्रमाणे, जाबदेणार यांच्या मिळकती या मुळ अर्जाचा निकाल लागेपर्यत कोणालाही हस्तांतरीत करु नये, विक्री करु नये, बोझा चढवु नये असा आदेश करण्याची विनंती केली आहे. परंतु अर्जदाराने सदरच्या कथनाच्या पृष्ठार्थ सदर मिळकतीबाबत तोंडी सांगण्याव्यतिरीक्त कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. शिवाय जाबदेणार हे सदर मिळकती हस्तांतरीत करण्याच्या प्रयत्नात आहे असे दिसुन येत नाही. अशा परीस्थीतीत अर्जदारांनी विनंती केल्याप्रमाणे जाबदेणार यांना अंतरीम स्थितीमध्ये आदेशीत करणे योग्य होणार नाही. सदर बाब पुराव्यानिशी अंतिम निकालाच्या वेळी ठरविणे योग्य होईल. त्यामुळे अर्जदार तशा स्वरुपाच्या प्रतिबंधात्मक आदेश मिळण्यास या घडीला पात्र नाही. सबब मी प्रश्न क्र.४ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>प्रश्न क्र. ५ करीता</u>** –

११. वर नमुद सर्व स्पष्टीकरण व प्रश्न क्र.१ ते ४ चे निष्कर्ष लक्षात घेता अर्ज अंशतः मंजुर होण्यास पात्र आहे. जाबदेणार क्र.१ याने अर्जदारांकडे दुर्लक्ष केलेले असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत असल्यामुळे अर्जदारांना प्रस्तुतचा अर्ज दाखल तारखेपासुन पोटगी देणे योग्य होईल. प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास येणा–या खर्चाचा विचार मुख्य अर्ज निकाली काढतांना विचारात घेता येईल. सबब, प्रश्न क्र.५ करिता मी खालील आदेश पारीत

करीत आहे.

**आदेश**

१. अर्जदारांचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात आला.

२. जाबदेणार क्र.१ गणेश बापु सोनवणे (पारधी) याने अर्ज दाखल दिनांक ०७.०९.२०१९ पासुन या प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत अर्जदारास एकत्रीत अंतरीम पोटगी व घरभाडे म्हणुन दरमहा रुपये ८,०००/-(अक्षरी रुपये आठ हजार मात्र) द्यावी असा त्यास हुकुम करण्यात येत आहे.

३. प्रस्तुत आदेशाची प्रत दोन्ही बाजुंना मोफत देण्यात यावी.

Digitally signed by SUJIT AMBADAS RATHOD
Date: 2022.04.30 12:17:53 +0530

( एस. ए. राठोड )

दिनांक – २८.०४.२०२२ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकूरातील शब्द न् शब्द मूळ आदेशाप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – बी.एन. थोरात |
| न्यायालयाचे नांव | – न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग–१, दोंडाईचा |
| पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. | – ३०.०४.२०२२ |

स्वाक्षरित/–
लघुलेखक.